MHRG100002332025

**दाखल तारीख :** २०/०३/२०२५
**नोंदणी तारीख :** २०/०३/२०२५
**निकाल तारीख :** १२/०३/२०२६
**कालावधी :** ०० व., ११ म., २० दि.

# प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : यु. एम. जाधव)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १४३/२०२५** **निशाणी क्र. २६/ब**

| | |
|---|---|
| फिर्यादी | **मास फायनानसियल सर्व्हीस लिमिटेड,**<br>**कंपनीचे अधिकृत वितरक,**<br>**निलेश ऑटोमोबाईल्सचे**<br>**प्रोप्रा. श्री. निलेश अरूण शिंदे,**<br>वय : ४६ वर्षे, व्यवसाय – धंदा,<br>रा. कवेआळी, महाड, ता. महाड, जि. रायगड. |
| प्रतिनिधीत्व | विधीज्ञ श्री. एस. डी. पोतदार |
| आरोपी | **श्री. असगर अब्बासमियाँ काळसेकर,**<br>वय – ५२ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. ६०अ, कांबळे तर्फे महाड, ता. महाड,<br>जि. रायगड. |
| प्रतिनिधीत्व | विधीज्ञ श्री. कादीर देशमुख |

## भाग 'ब'

## [फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७/०२/२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | निरंक |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | निरंक |
| प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | २०/०८/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | १२/०३/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | असगर अब्बासमिया काळसेकर | निरंक | निरंक | परक्राम्य संलेख अधि., १८८१ चे कलम १३८ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

## अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. फिर्यादीपक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | निलेश अरूण शिंदे | ०५ | फिर्यादी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

**अ. फिर्यादीपक्ष –**

| अनु. क्र. | स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | दिनांक ०३/०१/२०२५ रोजीचा धनादेश क्रमांक ०२६०१५ | १७ |
| २. | निशाणी क्र. १७ चा धनादेश परत आल्याचा मेमो | १८ |
| ३. | दिनांक १०/०२/२०२५ रोजीची आरोपीस धनादेश रक्कम मागणीची नोटीसची स्थळप्रत | १९ |
| ४. | निशाणी क्र. १९ ची नोटीस आरोपीला पाठविल्याची | २० |

| | | |
|---|---|---|
| | पोस्टाची पावती | |
| ५. | निशाणी क्र. १९ ची नोटीस व रजिस्टर पोस्ट केल्याबाबतची पोस्टाची पावती | २१ |
| ६. | ठरावाची प्रत | २२ |

**ब. <u>बचाव पक्ष</u> –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. <u>न्यायालयीन निशाणी</u> –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. <u>मुद्देमालाचे वर्णन</u> –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य

## (दिनांक माहे १२ मार्च, २०२६ रोजी पारीत)

आरोपी विरुध्द परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (ज्यास यापुढे 'अधिनियम' असे संबोधण्यात येत आहे) चे कलम १३८ प्रमाणे परिभाषीत तथा दंडनीय गुन्हयाच्या आरोपाकरिता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

**<u>फिर्यादीपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :–**

२. फिर्यादी हे "मास फायनानसियल सर्व्हीस लि." या कंपनीचे अधिकृत वितरक "निलेश ऑटोमोबाईल्सचे" प्रोप्रा श्री. निलेश अरूण शिंदे चे मालक आहेत. आरोपी यांनी फायनान्स कंपनीकडुन ॲक्टीवा गाडी क्रमांक एमएच–०६/बीएल–२७७१ ही कर्ज प्रकरण कयन, गाडी खरेदी घेतलेली आहे. सदर कर्ज घेतेवेळी आरोपीने फिर्यादी हे वितरक असलेल्या कंपनीचे कर्ज करारावर समजुन–उमजुन, अटी शर्तीवर सही केलेली आहे.

३. फिर्यादी हे "मास फायनानसियल सर्व्हीस लि." या कपंनीचे अधिकृत वितरक असल्याकारणाने त्यांना ग्राहकांना कर्ज देणे, कर्जाचे हप्ते स्वीकारणे, थकीत कर्जदारांवर कारवाई करणे इत्यादी अधिकारी फिर्यादीस दिलेलेक आहेत. त्याचे अनुषंगाने फिर्यादीने दिनांक १२/०८/२०२४ रोजी वकीलांमार्फत कायदेशीर रजिस्टर नोटीस आरोपीस दिलेली होती. सदर नोटीसीस आरोपी यांनी उत्तर दिलेले नाही.

४. त्यानंतर आरोपी फिर्यादीचे निलेश अॅटो मोबाईल यांचे कार्यालयात दिनांक २०/१२/२०२४ रोजी प्रत्यक्ष भेट दिली व फिर्यादीस दिनांक ०३/०१/२०२५ रोजीचा बँक ऑफ इंडिया, शाखा महाड या बँकेचा रक्कम रू. ६९,३४५/– चा धनादेश क्रमांक ०२६०१५ दिला. सदरचा धनादेश फिर्यादीने बँक ऑफ इंडिया, शाखा महाड येथे वटण्याकरिता जमा केला असता, सदरचा धनादेश 'फण्ड्स इनसफिशियंट' असा शेरा मारून न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने त्यांचे वकीलांमार्फत आरोपीला दिनांक १०/०२/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने नमुद पत्त्यावर नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीला दिनांक १२/०२/२०२५ रोजी प्राप्त झाली. अशाप्रकारे फिर्यादीने वकीलांमार्फत पाठविलेली रजिस्टर पोस्टाची नोटीस आरोपीस पोहोचली. करिता, प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

५. आरोपी विरूध्द अधिनियम, १३८ अन्वये निशाणी क्र. १ वर जारी करण्याची प्रक्रियेचा आदेश पारीत केलेला आहे. आरोपी हजर झाल्यावर, त्याच्या विरूध्द अधिनियम, १३८ नुसार प्रतिकथन (निशाणी क्र. १६) नोंदविण्यात आले. सदर प्रतिकथन आरोपीला त्याच्या बोली भाषेत वाचुन दाखविले व समजावुन सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली. आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ अन्वये निवेदन (निशाणी क्र. २४) वर नोंदविण्यात आले.

६. फिर्यादीने सादर केलेला पुरावा व त्यावरील आरोपीचा बचाव यावरून खालील मुद्दे विचारासाठी घेतले आहेत आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादी सिध्द करतात काय की, आरोपीने दिलेला व न वटलेला धनादेशाबाबत आरोपीची कायदेशीररित्या लागु करण्यायोग्य दायित्व आहे आणि त्याद्वारे परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये अपराध केला आहे ? | ..नकारार्थी |
| २. | आरोपीने परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | ..नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | ....अंतिम आदेशानुसार |

# कारणमिमांसा

७. अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. आरोपी विरूध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी कंपनीतर्फे फिर्यादी निलेश अरूण शिंदे यांनी त्यांची साक्ष निशाणी क्र. ०५ वर नोंदविली आहे. फिर्यादी यांनी सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने दिलेला व न वटलेला धनादेशाबाबत आरोपीची कायदेशीररित्या लागु करण्यायोग्य दायीत्व आहे आणि त्याद्वारे परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये अपराध केला आहे.

## मुद्दा क्र. १ करीता :-

८. फिर्यादी कंपनीतर्फे साक्षीदार क्र. १ निलेश हे कंपनीचे अधिकृत वितरक आहेत. त्यांनी प्रस्तुत प्रकरणी साक्षीदार क्र. १ म्हणुन साक्ष दिली आहे. साक्षीदाराच्या सरतपासाचे अवलोकन केले असता, फिर्यादी यांनी त्यांच्या फिर्यादीमधील सर्व मजकुर जशाच्या तसा पुर्नउच्चारीत केला आहे. त्यांच्या साक्षीतुन

दिनांक ०३/०१/२०२५ रोजीचा धनादेश क्रमांक ०२६०१५ निशाणी क्र. १७, तो धनादेश परत आल्याचा मेमो निशाणी क्र. १८, दिनांक १०/०२/२०२५ रोजीची आरोपीस धनादेश रक्कम मागणीची नोटीसची स्थळप्रत निशाणी क्र. १९, ती नोटीस आरोपीला पाठविल्याची पोस्टाची पावती निशाणी क्र. २०, फिर्यादीने आरोपीला चेक टाकण्यापुर्वी दिलेली नोटीस व रजिस्टर पोस्ट केल्याबाबतची पोस्टाची पावती निशाणी क्र. २१ इत्यादी कागदपत्रे सिध्द करण्यात आली आहेत. त्यानंतर फिर्यादी यांनी पुरावा संपल्याची पुरशिस निशाणी क्र. २३ वर दाखल करण्यात आली. आरोपीतर्फे त्याच्या बचावापृष्ठयर्थ कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही.

९. आरोपी हे फिर्यादी कंपनीचे कर्जदार असल्याने आरोपी यांनी फिर्यादी कंपनीकडुन ॲक्टीवा गाडी क्रमांक एमएच–०६/बीएल–२७७१ ही कर्ज प्रकरण करून खरेदी केलेली आहे. आरोपीने ठरलेल्या रक्कमेपैकी कोणत्याही रक्कमेची परत फेड केली नाही. फिर्यादीतर्फे आरोपीकडे येणे बाकी कर्ज रक्क्मेची व व्याजाची मागणी केली होती. आरोपी हा फिर्यादीचे कायदेशीर देणे लागत असल्याने त्या कायदेशीर दायित्वापोटी आरोपीने फिर्यादीस निशाणी क्र. १७ चा धनादेश दिला. तो धनादेश वटेल याची हमी देखील आरोपीने फिर्यादीस दिली. त्यामुळे फिर्यादीने तो धनादेश दिनांक २३/०१/२०२५ रोजी बँकेत वटण्यासाठी भरला असता तो 'फण्ड्स् इनसफिशियंट' अशा शेऱ्यानिशी परत आला. सरतेशेवटी, फिर्यादीने निशाणी क्र. १९ ची नोटीस त्यांच्या विधीज्ञांमार्फत पाठविली. सदरची नोटीस आरोपीला दिनांक १२/०२/२०२५ रोजी मिळुन देखील आरोपीने फिर्यादीस देय लागणाऱ्या धनादेशाच्या रक्कमेची परतफेड केली नाही. त्यामुळे फिर्यादीने आरोपी विरूध्द खटला दाखल केला.

१०. फिर्यादीचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला नसल्याने व वरील सर्व विवेचनावरून, सामान्यदृष्टया असे दिसुन येते की, आरोपी हा धनादेशाचा अनादर व त्याबाबतचे कायदेशीर दायित्व त्याबाबतच्या गृहितकांचे खंडण करू

शकलेला नाही. परंतू, वरील सर्व घटनाक्रमानंतर फिर्यादी यांनी आरोपी यांची रक्कम परत देणेचे दायित्व पुरावा दिल्यानंतर नाकारले आहे. खटल्याचे स्वरूप पाहता, खटला हा आर्थिक स्वरूपाच्या व्यवहारापोटीचा असल्याने फिर्यादीस खटल्याचा निकाल होण्यापुर्वी कोणत्याही क्षणी आपसात तडजोडीचा किंवा खटला मागे घेण्याचा हक्क प्राप्त होतो. फिर्यादी यांची आरोपी विरूध्द सद्यस्थितीला तक्रार राहिलेली नाही, असे फिर्यादी यांनी न्यायालयासमोर उपस्थित राहुन सांगितले आणि त्या पृष्ठयर्थ फिर्यादी यांनी स्वत:च्या सहीनिशी न्यायालयाबाहेर झालेल्या आपसात तडजोडीच्या अनुषंगाने पुरशिस निशाणी क्र. २५ दाखल केली. त्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी यांना खटला संपरिक्षेत करण्यास स्वारस्य राहिलेले नाही. तसेच, फिर्यादीचे आरोपी हा कायदेशीर देणे लागत असलेल्या बाबींची पुर्तता झाल्याने उभयपक्षकारांना प्रस्तुत प्रकरणी इतर पुरावा दयायचा नसल्याचे स्पष्ट होते. फिर्यादीने दाखल केलेल्या तडजोड पुरशिस अन्वये फिर्यादीने कोणत्याही अटी शर्ती शिवाय तडजोड केल्याचे निष्पन्न होते.

**११.** प्रस्तुतचा खटला हा पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये नुसार मिळालेल्या अधिकार व नियमांनुसार फिर्यादी हा प्रकरण कधीही मागे घेवु शकतो. फिर्यादी यांस आरोपी विरूध्द खटला चालविण्याचा नाही. फिर्यादी यांना आरोपीकडुन तडजोडीअंती ठरलेली रक्कम मिळाल्यामुळे त्यांची आरोपी विरूध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणात काहीही तात्पर्य उरत नाही. येणेप्रमाणे वरील सर्व उहापोहावरून थेट, सबळ, सक्षम व विश्वसार्ह पुराव्याअभावी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नोंदविण्यात येत आहे.

## मुद्दा क्र. ३ करीता :-

**१२.** मुद्दे क्रमांक १ व २ बाबत नकारार्थी अभिप्राय नोंदविला असल्यामुळे फिर्यादीपक्षाने पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ खालील शिक्षापात्र अपराध शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपीला वरील अपराधातून दोषमुक्त

करणे संयुक्तीक होईल.

**१३.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने यापुर्वी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कायम करणे उचीत ठरेल. सबब, मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी यांना पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ खालील दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| **२.** | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने यापुर्वी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले रक्कम रू. १५,०००/– वैयक्तीक जातमुचलके व तितक्याच रकमेचा जामीन कदबे केवळ पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कायम करण्यात येत आहेत. |
| *(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)* | |

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV Date: 2026.03.12 18:17:00 +0530

(यु. एम. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड.

महाड,
दिनांक : १२/०३/२०२६.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh |
| Date of decision / typed | :- | 12/03/2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 12/03/2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 12/03/2026 |